शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

||| विद्याधनं सर्वधन् प्रधानम् |||

दि. महाराष्ट्र एज्युकेशन अॅन्ड स्पोर्टस् अकॅडमी चंदगड

# महादेवराव बी.एड्. कॉलेज, तुर्केवाडी

# ता. चंदगड, जि. कोल्हापूर

# सन 2024 -2025

# Best Practices

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

# आणि

# व्यावसायिक शिक्षण

## दिनांक :- 11/04/2025

## उपक्रमाचे नाव

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि व्यावसायिक शिक्षण

**प्रास्ताविक:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केंद्र सरकारकडून जाहीर करण्यात आले. 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरानंतर जवळपास 34 वर्षाने शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारक बदल करणारे असे हे धोरण आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात काम करणारे शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, तसेच पालक, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळीना सर्वानाच हे नवीन शैक्षणिक धोरण समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. शिक्षक हा  एक शैक्षणिक धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे शालेय स्तरावरील बदल, व्यावसायिक शिक्षण व त्याची अंमलबजावणी याबाबत त्यांना उदबोधन होणे गरजेचे आहे. त्यामुळे महाविद्यालयाकडून चंदगड तालुक्यातील माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्यासाठी "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020  आणि व्यावसायिक शिक्षण" या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळा दिनांक 11/04/2025 रोजी आयोजित करण्यात आली.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे:**

१) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 याबाबत शिक्षकांना उदबोधन करणे.
२) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील व्यावसायिक शिक्षणाची भूमिका समजून घेणेस मदत करणे.
३) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील शालेय स्तरामधील शिफारशी व अपेक्षित बदल यावर चर्चा घडवून आणणे.
४) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व महाविद्यालय यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करणे.

**कार्यक्रमाची कार्यवाही :**

महादेवराव बी. एड. कॉलेज, तुर्केवाडी येथे शुक्रवार दिनांक 11/04/2025 रोजी सकाळी 11.00 ते 3.00 या कालावधीत नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि व्यावसायिक शिक्षण यासंदर्भात मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यामध्ये सकाळी ठीक 11.00 ते 11.30 वाजेपर्यंत उपस्थितांची नावनोंदणी करण्यात आली.त्यानंतर या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ पार पडला. या उद्घाटनासाठी अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थाध्यक्ष  मा. श्री. महादेवराव वांद्रे हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून चंदगड तालुका

मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री. भोगुलकर, चंदगड तालुका मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष श्री. एम. बी.पाटील, को. जि. मा. शी. संचालक श्री. पाटील, मा. श्री. नरसिंग पाटील. मा. श्री.मोहन परब, मा. श्री. उमर पाटील इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. प्रा. श्री. एन. जे. कांबळे यांनी केले. या कार्यक्रमामध्ये “नवीन शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक शिक्षण” या विषयावर बी.एड. विभागाचे प्रमुख प्रा. श्री. प्रधान ग.गो. यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेल्या या क्रांतीकारी शैक्षणिक धोरण 2020 मधील मुख्य बदलांचा आढावा सांगितला. बदलत्या काळानुसार शिक्षण संस्थेतून बाहेर पडणारा विद्यार्थी हा क्षमताधीष्टीत, कौशाल्याभिमुख विद्यार्थी तयार होणे अपेक्षित आहे. डॉ. राधाकृष्ण विद्यापीठ आयोगापासून नवीन शैक्षणिक धोरणांपर्यंत शिक्षण क्षेत्रात झालेले बदल यावेळी त्यांनी स्पष्ट केले. नवीन धोरणानुसार 5+3+3+4 असा आराखडा आता लागू होत असून व्यावसायिक शिक्षणाला प्राथमिक स्तरापासून सुरवात केलेली आहे. याची अमलबजावणी करताना स्थानिक व्यावसायिक, तसेच अभियांत्रिकी कॉलेज, औद्योगिक संस्था , कंपनी यांच्यासोबत सामंजस्य करार करणे अपेक्षित आहे. महाविद्यालयीन स्तरावर व्यवसायिक शिक्षणाचे प्रमाण वाढविन्यावर भर या धोरणामद्धे दिलेला आहे. आज शाळा, महाविद्यालय यांना नवनवीन मूल्यांकन पद्धतीला सामोरे जावे लागते त्यामुळे गुणवत्ता हा निकष मानून नवीन शैक्षणिक धोरणामधील आव्हानांना सर्वानी सामोरे जावे असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

या कार्यक्रमामध्ये महादेवराव वांद्रे पॉलिटेक्निकचे प्राचार्य मा. श्री. संतोष गावडे यांनी अभियांत्रिकी पदविकांचे महत्व आणि भविष्यकालीन उपयुक्तता यावर आपले विचार व्यक्त केले. तसेच महादेवराव वांद्रे फार्मसी कॉलेजचे प्राचार्य मा. श्री. सुधीर लंगरे यांनी डी. फार्मसी पदविका आणि बी. फार्मसी पदवी या व्यावसायिक शिक्षणाचे महत्व विशद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवर, मुख्याध्यापक, शिक्षक या सर्वांचे आभार प्रा. श्री. एम. आर. मुल्ला यांनी मानले.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक शिक्षण
# क्षणचित्रे












